गणेश चतुर्थी निमित्त हार्दिक शुभेच्छा..! -संपादक

दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता



vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● बुधवार दि.२७ ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Wednesday 27 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 12 ● Pages 4 ● Rate 4 Rs




# मटक्याच्या बाजारात अनेक कुटुंबांची होळी

## पोलीस प्रशासन मात्र भाजतंय स्वत:चीच पोळी!

### आयपीएस पंकज कुमावत असताना मटका माफियांची मजाल नव्हती

**केज (प्रतिनिधी)-केज तालुक्यात व शहरात मटक्याचे साम्राज्य बिनधास्त सुरू असून कायद्याचे रक्षकच कायद्याचे धाबे दणाणवू शकत नाहीत, असे धक्कादायक चित्र पाहायला मिळत आहे. मटक्याच्या व्यसनामुळे अनेक कुटुंबांची होळी होत असताना केज पोलीस मात्र हातावर हात ठेवून बसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. शहरातील टपऱ्या, हॉटेल्स आणि अगदी प्रशासनाच्या रिकाम्या जागांवरही उघड्यावर मटक्याचे तिकीट फाडले जात असताना पोलिस केवळ दोन-चार दिखाऊ कारवाया करून 'आम्ही काम करतोय' असा दिखावा करत आहेत. मटका माफियांच्या राजवटीत तालुक्यातील अनेक घरांमध्ये आर्थिक कोंडी, कौटुंबिक कलह आणि गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत असल्याचे वास्तव कुणाच्याच लक्षात घेतले जात नाही.**

यापूर्वीच खून, बलात्कार, विनयभंग, ट्रॉसिटी, हाफ मर्डर अशा गंभीर गुन्ह्यांमुळे राज्यभर केज पोलिसांची प्रतिमा मलिन झाली आहे. तरीदेखील सध्याचे पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे हे मटका माफियांविरुद्ध एकही ठोस पाऊल उचलण्यास असमर्थ ठरले आहेत. या अकार्यक्षम कारभारामुळे स्थानिक नागरिक संतप्त असून, 'पोलिस-गुन्हेगार' युतीमुळेच मटका माफियांना मोकळे रान मिळत असल्याचा लोकांचा कडवट सूर आहे.गावोगावी मटक्याचा फड उघड्यावर सुरू असताना पोलीस ठाण्याच्या गेटसमोरही माफियांना भीती वाटेनाशी झाली आहे. त्यामुळेच आयपीएस पंकज कुमावत यांचा काळ लोकांना आजही आठवतोय. त्यांच्या कडक शिस्तीत गुन्हेगारांची धडकी भरली होती. मात्र आजची परिस्थिती मात्र याच्या पूर्ण विरुद्ध दिसत असून पोलिस यंत्रणा जनतेचा विश्वासघात करत असल्याची भावना तालुक्यात बळावली आहे.मटका माफियांच्या या उच्छादावर तातडीने अंकुश न लावलास, तर परिस्थिती हाताबाहेर जाण्याची भीती व्यक्त होत आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक कॉवत यांनी तातडीने हस्तक्षेप करून मटका माफियांना धडा शिकवावा, अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे.





# रघुवंशी गटाला मोठा धक्का: निष्ठावंत नेते संतोष पाटील यांचा भाजपमध्ये प्रवेश

**नंदुरबार । दिपक गोसावी**

रघुवंशी कुटुंबाशी गेल्या ५५-६० वर्षांपासून एकनिष्ठ असलेले आणि स्व. बटेसिंह रघुवंशी यांच्या काळापासून सोबत असलेले ज्येष्ठ नेते संतोष उत्तमराव पाटील यांनी अखेर भाजपमध्ये प्रवेश केला आहे. माजी मंत्री तथा विद्यमान आमदार डॉ. विजयकुमार गावित, माजी खासदार डॉ. हीना गावित आणि जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा डॉ. सुप्रिया गावित यांच्या उपस्थितीत त्यांनी भाजपचा झेंडा हाती घेतला. या प्रवेशामुळे रघुवंशी गटाला मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.

शनिमांडळ पंचक्रोशीतील राजकारणात महत्त्वाचे स्थान असलेले संतोष पाटील हे धुळे-नंदुरबार जिल्हा बँकेचे संचालक, तिलाली ग्रामपंचायतचे सरपंच आणि शनिमांडळ वी. का. सोसायटीचे चेअरमन म्हणून कार्यरत राहिले आहेत. त्यांचा परिचय प्रामाणिक, निष्ठावंत आणि तळागाळातील लोकांसाठी कार्य करणारा नेता म्हणून आहे.

भाजपमध्ये प्रवेश करण्यापूर्वी त्यांनी नंदुरबार तालुका विधायक समितीच्या संचालक पदाचा राजीनामा दिला. राजीनाम्यामागील कारण स्पष्ट करताना ते म्हणाले, स्वर्गीय बटेसिंह भैयांच्या राजकीय कारकिर्दीच्या सुरुवातीपासून संपूर्ण आयुष्य मी रघुवंशी परिवारासाठी समर्पित केले, पण माझ्या प्रामाणिक कार्याला अपेक्षित महत्त्व दिले गेले नाही. सतत डावलले जाणे आणि पाटील समाजातील कार्यकर्त्यांचा आवाज दाबला जाणे हे अत्यंत खेदजनक आहे. म्हणूनच हा निर्णय घेतला. डॉ. गावित यांच्या नेतृत्वावर आपला पूर्ण विश्वास असल्याचे सांगत संतोष पाटील यांनी आगामी जिल्हा परिषद निवडणूक ही जिल्ह्याच्या राजकारणासाठी दिशादर्शक ठरेल असा विश्वास व्यक्त केला. तसेच, तळागाळातील कार्यकर्त्यांना संधी मिळावी आणि शनिमांडळ पंचक्रोशीत युवा नेतृत्व तयार व्हावे यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. संतोष पाटील यांच्या जवळच्या कार्यकर्त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी त्यांना कधीच विश्वासात घेतले नाही. महत्त्वाच्या कामांमध्ये त्यांना स्थान न देणे आणि विशेषतः पाटील समाजाचा स्पष्ट वक्ता असल्यामुळे त्यांचे नेहमी खच्चीकरण करण्यात आले, यातूनच त्यांच्यातील नाराजी वाढत गेली. पाटील समाजातून नंदुरबार तालुका विधायक समितीतून राजीनामा देणारे ते पहिलेच संचालक आहेत.

# ना किसी को पता; ना किसी को खबर

## चक्क! तळ्यातूनच बेकायदेशीर मुरुम उपसा

### शेतकऱ्यांना मोबदला दिल्याशिवाय तळ्याचे सुशोभीकरण थांबवा-घुले

**केज । प्रतिनिधी**



केज नगरपंचायत हद्दीतील राजीव गांधी पाझर तलाव परिसरात बेकायदेशीररीत्या मुरुम उपसा सुरू असल्याने संताप व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे या धरणाच्या बांधकामासाठी गावातील एकूण २० शेतकऱ्यांची जमीन घेतली असून, न्यायालयाने शेतकऱ्यांना मोबदला देण्याचे आदेश दिले तरी अद्याप कोणत्याही शेतकऱ्याला मोबदला मिळालेला नाही. तरीदेखील तलावाचे सुशोभीकरणाचे काम गुपचूपपणे सुरू असल्याचा आरोप होत आहे. या संदर्भात शंकर भिमराव घुले, आण्णा भिमराव घुले, अच्युतराव राणबा घुले, यशवंत रामभाऊ घुले, जयवंत रामभाऊ घुले, गणपत लक्ष्मण घुले यांच्यासह १४ शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग केज, तहसीलदार केज व नगरपंचायत मुख्याधिकारी यांना निवेदन सादर केले. या निवेदनात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे की, शेतकऱ्यांचा संपूर्ण मोबदला मिळाल्याशिवाय तलावातून कोणताही मुरुम उपसा किंवा सुशोभीकरणाचे काम सुरू करू नयेतसेच, तलावाचा बांध दुरुस्त करण्याची मागणी देखील करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या या निवेदनावर एकूण २० शेतकऱ्यांच्या सह्या असून, त्यांच्या मागण्यांची गांभीर्याने दखल घेऊन कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शेतकरी नेते महादेव घुले यांनी केली आहे .

या प्रकरणामुळे केज शहरात पुन्हा एकदा प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उभे राहिले असून, संबंधित विभागांकडून तातडीने शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याची मागणी होत आहे.

# कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने चिचोंडी पाटील येथे उपबाजार समिती उभारणी

## ३० ऑगस्टला पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते भव्य उद्घाटन

**नगर । ईश्वर निमसे**



कृषी उत्पन्न बाजार समिती, अहिल्यानगरच्या वतीने शेतकऱ्यांच्या सोयीसाठी चिचोंडी पाटील येथे उपबाजार समिती उभारण्यात येत असून त्याचे उद्घाटन येत्या ३० ऑगस्ट रोजी होणार आहे. या उपबाजार समितीच्या उद्घाटन सोहळ्यास राज्याचे महसूलमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. श्री राधाकृष्ण विखे पाटील साहेब, राज्याचे पणनमंत्री मा. ना. श्री जयकुमार रावल साहेब यांच्या हस्ते होणार आहे.

या कार्यक्रमाला माजी खासदार श्री सुजयदादा विखे पाटील, आमदार श्री विक्रमसिंह पाचपुते, आमदार श्री संग्रामभैया जगताप, माजी सभापती श्री भानुदासजी कोतकर साहेब, युवा नेते श्री अक्षयदादा कर्डिले यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.उपबाजार समितीच्या स्थळाची पाहणी करताना ज्यांच्या संकल्पनेतून ही बाजारपेठ उभी राहिली त्या माजी मंत्री, आमदार श्री शिवाजीराव कर्डिले साहेब, बाजार समितीचे सभापती भाऊसाहेब बोठे, उपसभापती रभाजी सुळ साहेब, सचिव श्री भिसे साहेब तसेच सर्व संचालक मंडळाचे सदस्य उपस्थित होते. या वेळी चिचोंडी पाटील, मांडवे, सांडवे, दशमीगव्हाण, आठवड, उक्कडगाव, नारायणडोह, मदडगाव, टाकळी, कोल्हेवाडी परिसरातील पदाधिकारी, ग्रामस्थांनी सहभाग घेतला.या उपबाजारात जनावरांचा बाजार, भुसार मार्केट सुरू करण्यात येणार असून शेतकऱ्यांच्या मागणीनुसार आठवड्यातून दोन दिवस कांदा मार्केट सुरू करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. उपबाजार समितीमुळे परिसरातील शेतकऱ्यांना आपली कृषी उत्पादने विक्रीसाठी सहज व सोयीस्कर सुविधा उपलब्ध होणार आहेत.

# ऊर्मिलाताई आनंदगांवकर यांचे निधन

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील आनंदगाव येथील मूळ रहिवासी सध्या केज येथील निवासी जेष्ठ महिला उर्मिलाताई माणीकराव आनंदगांवकर वय ७१ वर्ष यांचे अंबाजोगाई येथे उपचारादरम्यान निधन झाले.

मंगळवार रोजी सायंकाळी केज येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या धार्मिक प्रवृत्तीच्या व प्रेमळ स्वभावाच्या म्हणून त्या परिचित होत्या.कवी सेवानिवृत्त प्रा कवी माणिकराव आनंदगावकर यांच्या त्या पत्नी होत. त्यांच्या पश्चात पती ,मुलगा ,सून नातवंडे असा मोठा परिवार आहे. बँक मॅनेजर महेश कुलकर्णी यांच्या त्या मातोश्री होत.



# मांजराचे पाणी नियोजनबध्द शेतकऱ्यांपर्यंत पोहोचू-खा.बजरंग सोनवणे

## जलपुजन कार्यक्रमाला शेतकऱ्यांची गर्दी

**बीड । प्रतिनिधी**



शेतीसाठी पाणी आवश्यक असते. यावर्षी मांजरा धरण वेळेत पुर्णक्षमतेने भरले असून भविष्यात मांजरा धरणाचे पाणी नियोजनबद्ध पद्धतीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि परिसराच्या विकासासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहीन, असे प्रतिपादन खा.बजरंग सोनवणे यांनी केले.

केज, अंबाजोगाई, धारूर, लातूर, कळंब या शहरासह ६१ गावांची तहान भागवणारे व मांजरा पट्ट्यातील पाच तालुक्यातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली आणणारे केज तालुक्यातील धनेगाव येथील मांजरा धरण १०० टक्के भरले आहे. दि.२६ रोजी सकाळी १० वाजता खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते जलपुजन करण्यात आले. जलपूजन प्रसंगी माजी आमदार पृथ्वीराज साठे, राजेसाहेब देशमुख, नरेंद्र काळे, प्रकल्प अधिकारी वर्ग, पंचायत समिती सदस्य, सरपंच, उपसरपंच, चेअरमन तसेच मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते.मांजरा धरण हे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आयुष्याशी, शेतीशी आणि उपजीविकेशी घट्ट जोडलेले महत्त्वाचे धरण आहे. या धरणामुळे परिसरातील हजारो हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येते. दरवर्षी शेतकऱ्यांची पिकांची आशा या धरणाच्या पाण्यावरच अवलंबून असते. यंदा धरण पूर्ण क्षमतेने गस्ट महिन्यातच भरल्यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि दिलासा दिसून येत आहे. मांजरा धरणाचे पाणी नियोजनबद्ध पद्धतीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि परिसराच्या विकासासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहीन, असा विश्वास यावेळी व्यक्त केला. मांजरा धरणातून लातूर शहर, लातूर औद्योगिक वसाहत, केज, अंबाजोगाई, धारूर, कळंब या शहरासह ६१ गावे मांजरा धरणातील पाणी पुरवठ्यावर निर्भर असतात. मांजरा धरण पिण्याचे पाण्याबरोबर शेती पिकांना लागणाऱ्या पाण्यासाठी देखील महत्त्वपूर्ण आहे. धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्या अंतर्गत बीड, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यातील ७३ गावातील १८ हजार २२३ हेक्टर शेतजमीन सिंचनाखाली येते. डावा कालवा ९० कि.मी. अंतराचा आहे. त्यातून १०,५५९ हेक्टर शेती तर, उजवा कालवा ७८ कि.मी.चा असून त्याअंतर्गत ७६६५ हेक्टर शेती सिंचनाखाली येते. खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामासाठी सरासरी १८५ दलघमी पाण्याचा वापर होते. याशिवाय केज व कळंब तालुक्यातील २७ गावातील शेतकऱ्यांना मांजरा धरणाच्या बॅकवॉटर पाण्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष लाभ होतो, अशी माहिती यावेळी अधिकाऱ्यांनी उपस्थितांना दिली.

संपादकीय

# महापुराचे संकट तूर्तास टळले, नुकसान अटळ!

पश्चिम महाराष्ट्रातील सांगली, सातारा आणि कोल्हापूर जिल्हे कृष्णा, वारणा आणि पंचगंगा नद्यांच्या खोऱ्यात वसलेले आहे. हे भाग शेती, साखर उद्योग आणि हळदीसारख्या व्यापारी पिकांसाठी प्रसिद्ध आहेत; परंतु २००५, २०१९, २०२१ आणि २०२२ मधील महापुरांनी या जिल्ह्यांमध्ये प्रचंड नुकसान केले. यावर्षी अलमट्टी धरणाच्या नियोजित पाणी विसर्ग, हवामान अंदाज आणि प्रशासकीय तत्परतेमुळे महापूर टळला; परंतु भूतकाळातील या आपत्तींनी सांगली, सातारा आणि कोल्हापूरमधील जनजीवन, शेती आणि उद्योगांना मोठा फटका बसला. २०२५ मध्ये सुद्धा हे नुकसान अटळ आहे. धोका तूर्तास टळला असला तरी तो कायमचा दूर करणे आवश्यक आहे. सरकारच्या ३२०० कोटीच्या योजनेतून महापुरातचे संकट टळणेही जवळपास अशक्य आहे.अलीकडच्या काळात दक्षिण महाराष्ट्राला महापुराचे दणके बसण्याची सुरुवात २००५ मध्ये झाली. जेव्हा सांगली जिल्ह्यात कृष्णा नदीने ५४ फूट पाणीपातळी ओलांडली, ज्यामुळे वाळवा, पलूस आणि मिरज तर वारणाच्या महापुराने शिराळा आणि पुढे सांगलीला मोठा फटका बसला. कोल्हापूर कर्नाटकातील बेळगाव, बागलकोट जिल्ह्यातील नदीकाठच्या तालुक्यांतील गावेही पाण्याखाली गेली. साताऱ्यात कोयना आणि कृष्णा नद्यांनी धोक्याची पातळी गाठली, तर कोल्हापुरात पंचगंगा नदीने ५७ फूट पाणीपातळी ओलांडली. या पुरामुळे सांगलीत हजारो हेक्टर शेती, घरे आणि हळद व्यापार, साठवणुकीची पेवे आणि उद्योगांचे नुकसान झाले. साताऱ्यात कास आणि कोयना परिसरातील रस्ते आणि पूल उद्ध्वस्त झाले, तर कोल्हापुरात शेती आणि व्यापारी बाजारपेठांना मोठा फटका बसला. २०१९ मध्ये परिस्थिती अधिक गंभीर होती. सांगलीत कृष्णा नदीने ५५ फूट पाणीपातळी गाठली आणि अलमट्टी धरणातून ५.५ लाख क्युसेक पाणी सोडण्यात आले, ज्यामुळे सांगली शहर, मिरज आणि भिलवडी, शिरोळ आठवडाभर पाण्याखाली होते.कोल्हापुरात पंचगंगा नदीने ५८ फूट पातळी गाठली, तर साताऱ्यात कोयना धरणातून पाणी सोडल्याने कराड आणि पाटण तालुक्यांत नुकसान झाले. या पुरामुळे सांगलीत सुमारे ३५०० कोटी, कोल्हापुरात १२० कोटी आणि साताऱ्यात १५०० कोटींचे नुकसान झाले. शेती, साखर कारखाने आणि लघु उद्योग ठप्प झाले. २०२१ मध्ये सांगलीत ९ दिवसांत सरासरीपेक्षा ७५८% जास्त पाऊस पडला, ज्यामुळे पलूस तालुक्यातील अंकलखोपसह अनेक गावांतील ऊस, द्राक्ष आणि हळद पिकांचे नुकसान झाले. कोल्हापुरात ५ दिवसांत ५०% जास्त पावसाने पंचगंगा नदीला पूर आला, तर साताऱ्यात कोयना आणि कास परिसरात दरडी कोसळल्या. २०२२ मध्ये अवकाळी पावसाने सांगलीत द्राक्ष, डाळिंब आणि ऊस पिकांना फटका बसला, तर कोल्हापुरात साखर कारखान्यांचे गाळप खोळंबले. साताऱ्यातील फळबागांचेही नुकसान झाले. या काळात सांगली, सातारा आणि कोल्हापूरमधील ८९० गावांना फटका बसला, ७६ जणांचा मृत्यू झाला आणि ९० हजार लोकांना स्थलांतर करावे लागले. यापुढे महापूर कधीही आला तर हे नुकसान अटळ ठरते.अलमट्टी धरण आणि पाणी विसर्ग कर्नाटकातील अलमट्टी धरण हे सांगली आणि कोल्हापूरमधील पुरांचे प्रमुख कारण आहे असे मानले जाते, तर धरण परिचलनातील चुकांमुळे महापूर येतो असा दुसरा व्यक्तिवाद आहे. २००५ आणि २०१९ मध्ये अनियंत्रित पाणी विसर्गामुळे पूर आला, परंतु २०२५ मध्ये कर्नाटक आणि महाराष्ट्र सरकारांनी समन्वयाने २ लाख क्युसेक पाणी नियंत्रितपणे सोडले, ज्यामुळे सांगली, सातारा आणि कोल्हापूरला मोठा दिलासा मिळाला. तरीही, अलमट्टीच्या पाणलोट क्षेत्रातील अतिक्रमण, पाणीसाठा आणि वृक्षतोड यामुळे भविष्यातील धोके कायम आहेत.शेती, उद्योग आणि दळणवळणावरील परिणाम सांगली, सातारा आणि कोल्हापूर हे ऊस, द्राक्ष, हळद आणि ज्वारीसाठी प्रसिद्ध आहेत. २००५ आणि २०१९च्या पुरांमुळे सांगलीत कारखाने ठप्प झाले, तर कोल्हापुरातील लोखंड बाजार आणि साताऱ्यातील लघू उद्योगांना फटका बसला. २०२१ आणि २०२२ मधील अवकाळी पावसाने सांगलीत द्राक्ष आणि हळद पिकांचे नुकसान केले, तर साताऱ्यातील कास परिसरातील पर्यटन आणि कोल्हापुरातील व्यापारी बाजारपेठा ठप्प झाल्या. दळणवळणातही अडथळे आले; सांगली–कोल्हापूर रस्ता, मिरज–पुणे रेल्वे मार्ग आणि सातारा–पुणे महामार्ग काही काळ बंद राहिले. यंदा २०२५ मध्ये पूर टळल्याने शेती आणि उद्योगांना दिलासा मिळाला; परंतु अनियमित पावसामुळे उत्पादन कमी राहण्याची शक्यता आहे.संकट आणि उपाय सांगली, सातारा आणि कोल्हापूरमधील पूर संकट हे नैसर्गिक आणि मानवनिर्मित कारणांचे मिश्रण आहे. अलमट्टी आणि कोयना धरणांचे अनियोजित पाणी विसर्ग, नद्यांचे अतिक्रमण आणि हवामान बदल यामुळे संकट गहिरे होते. उपाय म्हणून, नदी खोलीकरण, अतिक्रमण हटवणे, धरण व्यवस्थापनात रिअल–टाइम मॉनिटरिंग आणि स्थानिकांना पूर व्यवस्थापनाचे प्रशिक्षण आवश्यक आहे. हवामान बदलाचा सामना करण्यासाठी वृक्षारोपण आणि जलसंधारण प्रकल्पांना प्राधान्य द्यावे.राज्य सरकारचा ३००० कोटींचा प्रकल्प आणि वाद महाराष्ट्र सरकारने 'महाराष्ट्र रिझिलिन्स डेव्हलपमेंट प्रोग्राम' अंतर्गत ३२०० कोटींचा प्रकल्प जागतिक बँकेच्या सहकार्याने सुरू केला आहे, ज्यामुळे सांगली आणि कोल्हापूरमधील पूर पाणी मराठवाड्याकडे वळवले जाईल. यात पंचगंगा नदीचे खोलीकरण, राधानगरी धरणात वक्राकार दरवाजे आणि भोगावती खोऱ्यातून दूधगंगा खोऱ्यात पाणी वळवणे समाविष्ट आहे. तसाच खर्च सांगली शहरासह जिल्ह्यातील कामांवर होणार आहे. हा प्रकल्प मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागांना लाभ देईल; परंतु सांगली आणि कोल्हापूरमधील शेतकरी आणि पर्यावरणवाद्यांनी याला विरोध केला आहे. त्यांचा आक्षेप आहे की, पाणी वळवल्याने स्थानिक शेती आणि जैवविविधतेवर विपरीत परिणाम होईल. तसेच, प्रकल्पाच्या एकाच वेळी पाणी उचलण्याच्या क्षमतेवर, त्याच्या खर्चाच्या पारदर्शकतेवर आणि भूसंपादनावरून वाद आहेत. काही तज्ज्ञांचे मत आहे की, पाणी वळवण्याऐवजी स्थानिक जलसंधारण प्रकल्पांना प्राधान्य द्यावे.पूर नियंत्रणासाठी उपाय १. सांगलीतील कृष्णा, कोल्हापुरातील पंचगंगा आणि साताऱ्यातील कोयना नद्यांचे खोलीकरण करावे. २. अलमट्टी आणि कोयना धरणातून पाणी सोडण्यासाठी रिअल–टाइम मॉनिटरिंग आणि समन्वय आवश्यक आहे. ३. पूर व्यवस्थापन प्रशिक्षण आणि आपत्ती व्यवस्थापन उपकरणे स्थानिकांना उपलब्ध करावीत. ४. सह्याद्रीतील वृक्षतोड थांबवून जलसंधारण प्रकल्प राबवावेत. ५.३००० कोटींच्या प्रकल्पात स्थानिकांचा सहभाग आणि खर्चाची पारदर्शकता वाढवावी. ५. तंत्रज्ञान, समन्वय आणि स्थानिक सहभाग यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे या जिल्ह्यांना भविष्यातील संकटांपासून वाचवता येईल.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त 'रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा'

## पुरुष गटात श्री.सोमजाईदेवी प्रासादिक भजन मंडळ तर महिला गटात शिरसाई प्रासादिक महिला भजन मंडळ ठरले मानकरी

**पनवेल । प्रतिनिधी**

गोरगरिबांचे आधारवड, थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने पनवेलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धेच्या पुरुष गटात म्हसळ्याच्या श्री. सोमजाईदेवी प्रासादिक भजन मंडळाने तर महिला गटात कर्जतच्या शिरसाई प्रासादिक महिला भजन मंडळाने सर्वोत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. त्यांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेवक जयंत पगडे, भजनसम्राट निवृत्तीबुवा चौधरी यांच्यासह वारकरी संप्रदायातील मान्यवर तसेच आयोजन समितीचे सदस्य उपस्थित होते.


पुरुष गटात द्वितीय क्रमांक सुरताल भजन मंडळ नारंगी, तृतीय क्रमांक श्री. हनुमान प्रासादिक भजन मंडळ खारघरने तर उत्तेजनार्थ पारितोषिक अलिबागच्या स्वरविहार भजन मंडळाने पटकावले. यामध्ये उत्कृष्ट पखवाज वादक म्हणून श्री. हनुमान प्रासादिक भजन मंडळाचे कुणाल पाटील आणि उत्कृष्ट तबला वादक भूषण गायकर ठरले. महिला



गटात द्वितीय क्रमांक आई एकविरा महिला भजन मंडळ दुन्द्रेपाडा, तृतीय क्रमांक श्री. सदुरूकृपा प्रासादिक महिला भजन मंडळ चिंचवली आणि उत्तेजनार्थ पारितोषिक श्रीपती बाबा प्रासादिक भजन मंडळ नेरळ यांनी पटकाविले. उत्कृष्ट पखवाज वादक म्हणून कै. वैयजंती माता भजन मंडळ रसायनीचे ओमकार तराळे तर आई एकविरा भजन मंडळाचे रोहन पाटील उत्कृष्ट तबला वादकचे मानकरी ठरले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त वर्षभर विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने भजन परंपरेला प्रोत्साहन देण्यासाठी या भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पनवेल शहरातील मार्केट यार्ड मधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात ही स्पर्धा रंगली. या स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरलेल्या विजेत्या मंडळाला प्रत्येकी ५१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकाला २५ हजार रुपये, तृतीय क्रमांकास १५ हजार रुपये, उत्तेजनार्थ पारितोषिक ७ हजार रुपये, तसेच उत्कृष्ट पखवाज वादक व उत्कृष्ट तबला वादक यांना प्रत्येकी ७ हजार रुपये आणि सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून पंडित शंकरराव वैरागकर, बंडाराज घाडगे, नंदकुमार पाटील यांनी काम पाहिले. या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीसाठी पुरुष गटातून ३६ तर महिला गटातून ३० भजन मंडळांनी सहभाग घेतला होता. त्यामधून पुरुष गटातील अंतिम फेरीसाठी श्री सद्गुरू वामनबाबा प्रासादिक भजन मंडळ सिद्धी करवले, श्री हनुमान प्रासादिक भजन मंडळ खारघर, जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ वलप, श्री दत्त प्रासादिक भजन मंडळ गव्हाण, सुरताल भजन मंडळ नारंगी, जय श्री राधे गोविंद भक्ती समूह कामोठे, शारदा संगीत भजन मंडळ विचुंबे, स्वरविहार भजन मंडळ अलिबाग, श्री स्वामी समर्थ भजन मंडळ अंजप, श्री सोमजाईदेवी प्रासादिक भजन मंडळ म्हसळा, श्रीराम वरदायिनी भजनी मंडळ उलवे, श्री सिद्धेश्वर प्रासादिक संगीत भजन मंडळ आवास, श्री दत्त प्रासादिक भजन मंडळ वावंजे, गावदेवी प्रासादिक भजन मंडळ पेंधर, श्री गंगादेवी भजन मंडळ अलिबाग तर महिला गटात श्री पांडुरंग प्रासादिक भजन मंडळ खारघर गाव, आई एकविरा महिला भजन मंडळ दुन्द्रेपाडा, कुलस्वामिनी प्रासादिक भजन मंडळ ओवेपेठ, जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ वाजे, श्री सद्गुरू कृपा प्रासादिक महिला भजन मंडळ चिंचवली, कै. वैजयंती माता भजन मंडळ सावळे, सिद्धेश्वर प्रासादिक भजन मंडळ तळोजे मजकूर, श्री विश्वविजयनाथ सुहास्य संगीत विद्यालय उरण, ओमसाई भजन मंडळ खरसुंडी, नवदुर्गा प्रासादिक भजन मंडळ कोपरा, शिरसाई प्रासादिक महिला भजन मंडळ कर्जत, श्रीपती बाबा प्रासादिक भजन मंडळ नेरळ, जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ खोपोली, राधाकृष्ण प्रासादिक भजन मंडळ वावंजे, आणि ओंकार संगीत भजन मंडळ नेरळ या भजन मंडळांची निवड झाली होती. दोन दिवस चाललेल्या या भजन स्पर्धेत भजन मंडळांनी आपली कला सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या भजन स्पर्धेच्या आयोजनामुळे भजन मंडळ व कलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध झाले.

# सूर्यावर वादळवारे होतात का?

सूर्यावर हायड्रोजन व हेलियममध्ये सतत रासायनिक प्रक्रिया होत असल्यामुळे त्या प्रक्रियांमध्ये प्रचंड प्रमाणात उष्णता निर्माण होते. त्यामुळे सूर्यावर सतत स्फोट होत असतात. सूर्यावरील या स्फोटांमुळे निर्माण होणाऱ्या वाऱ्यांना सौरवारे किंवा सौरवात असे म्हणतात.सुभाष आता आदित्यच्या समूहाचा एक सदस्य मित्र बनला होता. आदित्य व त्याच्या मित्रांनासुद्धा सुभाषची मैत्री आवडत होती कारण त्यांना त्याच्याकडून रोज मधल्या सुट्टीत सूर्याबद्दलचे ज्ञान मिळत होते. आपल्या पृथ्वीवर जसे वादळवारे होत असतात तसे सूर्यावरसुद्धा होतात का गड्या? मोन्टूने प्रश्न केला. सुभाष म्हणाला, सूर्यावर हायड्रोजन व हेलियममध्ये सतत रासायनिक प्रक्रिया होत असतात व त्या प्रक्रियांमध्ये प्रचंड प्रमाणात उष्णता निर्माण होत असते. त्यामुळे सूर्यावर सतत स्फोट होत असतात. सूर्यावरील या स्फोटांमुळे तेथे वारे निर्माण होतात. त्यांनाच सौरवारे किंवा सौरवात असे म्हणतात. हे वारे म्हणजे सौरकणांचा एक झोतच असतो व तो सतत वाहत असतो. सूर्यावरील स्फोट जास्त जोराने झाल्यास त्या वाऱ्यांना खूप वेग येतो व ते अतिशय जोराने वाहतात. त्यांनाच सौरवादळे असे म्हणतात. या सौरवातांचा आपल्या पृथ्वीवर काही परिणाम होतो का? पिंटूने विचारले. सूर्यावर होणाऱ्या या कमी–जास्त स्फोटांमुळे आपली पृथ्वीसुद्धा प्रभावित होत असते. पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षण क्षेत्रात व चुंबकीय क्षेत्रावरही त्यांचे परिणाम होत असतात. सौरवातातील इलेक्ट्रॉन्स हे वातावरणाच्या वरच्या भागात ओझोनची निर्मिती करतात, सुभाष उत्तरला. शास्त्रज्ञांच्या मते सूर्यावर डाग आहेत. ते कशाचे असतील काही कल्पना आहे का तुला? आदित्यने विचारले सूर्य अत्यंत उष्ण असा



अतिशय मोठा तारा आहे. सूर्यावर काळे डाग दिसतात. त्याचे कारण म्हणजे त्याच्या सर्वच पृष्ठभागाचे तापमान हे सारखेच असते असे नाही. ज्या भागाचे तापमान जास्त असते तो भाग अत्यंत तेजस्वी दिसतो व ज्या भागाचे तापमान किंचितसे आजूबाजूच्या भागापेक्षा कमी असते तो भाग थोडासा काळसर दिसतो. सूर्यावरील या काळ्या डागांनाच सूर्याचे डाग किंवा सौरडाग अथवा सौर कलंक असे म्हणतात. या डागांतील वायूंचे रेणू आपापसात किंचितसे दुरावल्याने सूर्यगर्भापासून थोडेसे दूर जातात व त्यामुळे ते भाग त्यांच्या बाजूच्या भागांच्या मानाने थोडेसे थंडही होतात. त्यामुळे त्यांपासून प्रकाशक्षेपण म्हणजे प्रकाशाचे उत्सर्जन कमी होते म्हणून ते थोडेसे काळसर दिसतात. सुभाषने सांगितले. पण ते डाग कशामुळे होतात याबद्दल तू काहीच सांगितले नाही? आदित्यने पुन्हा त्याला प्रश्न केला. सुभाष म्हणाला, सूर्यावर सतत विद्युत चुंबकीय वादळे होत असतात. ते आपसात सतत घुसळत असतात. त्यामुळे सूर्यावरच्या काही ठिकाणच्या चुंबकीय क्षेत्रांना पीळ पडत जातो. त्यांनी सूर्यावर डाग पडतात असे शास्त्रज्ञ सांगतात. या सौरडागांची संख्या नियमितपणे कमी – जास्त होत असते. दर अकरा वर्षांच्या काळात सौर डागांची संख्या कमी–जास्त होण्याचे एक चक्र पूर्ण होते. हे सौरडाग सूर्यावरील आपले स्थानही बदलतात. सूर्यावरील काही डागांची लांबी ही नव्वद हजार ते दीड लाख मैल तर रुंदी ही साठ हजार मैल असते. काही डाग हे गटागटाने एकत्र असतात. त्यांचे आकारही वेगवेगळे असतात. हे डाग अवकाशात ऋण भारित इलेक्ट्रॉन्सचे प्रकाशझोत फेकतात. या सौरडागांचा आपल्या पृथ्वीवर काही परिणाम होतो का? पुन्हा आदित्यनेच प्रश्न केला. सूर्यावरील डागांचा पृथ्वीवरही परिणाम होतो. सूर्याच्या ज्या भागावर डाग वाढले त्या समोरील पृथ्वीच्या भागात प्रचंड चुंबकीय वादळे निर्माण होतात. पृथ्वीवरील वादळांची तीव्रता ही डागांच्या प्रमाणात असते. जेवढे डाग जास्त तितकी वादळे जास्त होतात. या वादळांमुळे विद्युत पुरवठ्यात खंड पडू शकतो, विद्युत उपकरणे बिघडू शकतात, रेडिओ, टीव्ही प्रक्षेपण, इंटरनेट बंद पडू शकते. आपल्या उपग्रहांचे आयुष्य कमी होऊ शकते, त्यांचा पृथ्वीशी संपर्क तुटू शकतो. ओझोन वायूच्या पातळीवरही त्यांचा विपरीत परिणाम होतो. सुभाषने सांगितले. नेहमीसारखी मधली सुट्टी संपली नि आपली सूर्यज्ञानाविषयीच्या महितीची चर्चा अपूर्ण सोडून ती मुलं आपापल्या वर्गात गेली.

# मुख्यमंत्री युवा कार्य कौशल्य प्रशिक्षण योजनेतील प्रशिक्षणार्थ्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न ऐरणीवर; महायुती सरकारला खडे बोल



**धुळे । प्रतिनिधी**

साक्री तालुक्यातील शासकीय विश्रामगृह येथे रविवारी मुख्यमंत्री युवा कार्य कौशल्य प्रशिक्षण योजनेतील हजारोंच्या संख्येने प्रशिक्षणार्थी एकत्र येऊन सरकारविरोधात रोष व्यक्त केला. शासनाच्या बेफिकीरीमुळे थकलेला पगार, थांबलेला उदरनिर्वाह आणि भवितव्याचा प्रश्न ऐरणीवर आला असल्याने संतप्त युवा प्रशिक्षणार्थींनी महायुती सरकारला थेट इशारा दिला. यावेळी प्रशिक्षणार्थींनी महाआघाडीतील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्यावर थेट प्रहार करत तात्काळ थकित मानधन जमा करा, आम्हाला नियमित करून स्थिर रोजगार द्या, अन्यथा आम्हालाच दुसरा मार्ग अवलंबावा लागेल, असा इशारा दिला. संतप्त सुरात त्यांनी सांगितले की, जर ही उदासीन भूमिका कायम राहिली, तर येत्या जिल्हा परिषद निवडणुकीत आम्ही महायुतीला ताकदीची जाणीव करून देऊ. शासनाच्या दुटप्पी भूमिकेमुळे प्रशिक्षकांचेही पगार थकले असून अनेकांचा उदरनिर्वाह पूर्णपणे थांबलेला आहे. सव्वा लाखाहून अधिक प्रशिक्षणार्थी महाराष्ट्रात या योजनेअंतर्गत कार्यरत आहेत. सुरुवातीला सहा महिने, नंतर पाच महिने असे तब्बल अकरा महिने काम करूनही त्यांना मानधन मिळाले नाही. यातून प्रशिक्षणार्थींचे हाल होत असून, शासनाने केलेले आश्वासन केवळ कागदापुरतेच राहिले असल्याची खंत व्यक्त करण्यात आली. या बैठकीत सरकारने आम्हाला खेळणं समजू नये, अन्यथा प्रहार संघटना व इतर संघटनांना सोबत घेऊन आम्ही रस्त्यावर उतरण्याशिवाय राहणार नाही,असा इशारा देण्यात आला. संपूर्ण राज्यातील युवा प्रशिक्षणार्थी या आंदोलनात उतरले असून सरकारच्या उदासीन भूमिकेमुळे संतापाचा सूर अधिक तीव्र होत चालला आहे. कौशल्य विकासाच्या नावाखाली बेरोजगारी वाढवणारे हे सरकार आम्हाला मान्य नाही, अशा शब्दांत प्रशिक्षणार्थींनी महायुती सरकारला खडे बोल सुनावले.

# पत्रकारांच्या आधी स्वीकृतीसाठी सर्वतोपरी मार्गदर्शन व सहकार्य करणार-आत्मलिंग शेटे

## बीड जिल्हा कार्यकारिणीच्या विस्ताराची बैठक

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय लघु व मध्यम पत्रकार संघटनेची बैठक २६ ऑगस्ट २०२५ रोजी बीड जिल्हा शासकीय विश्रामगृह येथे आयोजित करण्यात आली. या बैठकीत मराठवाड्याचे अध्यक्ष आत्मलिंग शेटे यांनी अनेक नवे पदाधिकारी नियुक्त केले. दैनिक महाभारतचे जिल्हा प्रतिनिधी नितीन जोगदंड यांना जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्त करण्यात आले. याशिवाय दैनिक लोकनेताचे जिल्हा प्रतिनिधी विजय रोडे, बीड स्वरधाराचे संपादक कृष्णा शिंदे, आणि दैनिक महाराष्ट्र प्रतिमाचे इरफान सय्यद यांना संघटक म्हणून नियुक्तीपत्र देण्यात आले. न्यूज २३ मराठीचे गणेश शिंदे यांना जिल्हा सदस्यपदी निवडण्यात आले, तसेच दैनिक परळी नगरीचे दत्ता शिवगण आणि दैनिक जनसामान्यांचा विकासनामाचे संपादक बाळासाहेब फपाळ यांचीही निवड करण्यात आली. तालुका अध्यक्षपदी प्रवीण वडमारे यांची नियुक्ती झाली.बैठकीत बीड जिल्हा संघटनेचे सचिव बालाजी जगतकर यांनी संघटनेच्या महत्त्वावर चर्चा केली आणि बीडच्या पत्रकारांच्या मुख्य मागण्यांचे निराकरण करण्याचे आश्वासन शासन स्तरावर दिले. आत्मलिंग शेटे यांनी पत्रकारांच्या आव्हानांवर विचार केला आणि आवश्यक त्या स्वीकृतीसाठी वरिष्ठ स्तरावर सहकार्याची हमी दिली.

बैठकीच्या प्रारंभात उपस्थित पत्रकारांना पुष्पहार देऊन सत्कारण्यात आले. या बैठकीत संघटनेच्या विस्तारावर चर्चा करण्यात आली, तसेच पत्रकारांचे जाळे निर्माण करण्यासाठी संघटनात्मक बांधणीवर भर देण्यात आला, ज्यामुळे पत्रकार संघटनेची ताकद वाढवण्याची योजना आहे. समारोप ही बैठक बीड जिल्ह्यातील पत्रकारांसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरली असून, संघटनेतील एकजुटीचा आणि सहकाराचा संदेश सर्वत्र पोहोचवला गेला.

आपले विचार व्यक्त करीत असताना आत्मलिंग शेटे यांनी सांगितले की स्वीकृती धारक पत्रकारांना अनेक बसेस मध्ये डावलले जाते शिवनेरी तसेच ई,-बस यामध्ये त्यांना प्रवास करता येत नाही तरी त्याबाबत लवकरच परिवहन मंत्री सरनाईक यांना सर्व पत्रकाराच्या वतीने राष्ट्रीय उपाध्यक्ष आप्पासाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ भेटणार असल्याचे आत्मलिंग शेटे यांनी सांगितले.



## गणेशोत्सवासाठी पश्चिम महाराष्ट्र मधील नागरिकांना मोठी दिलासा देणारी सेवा








**मुंबई । प्रतिनिधी**

आज नवी मुंबईतुन भोर, सातारा, कराड, कोल्हापूर ला जाणाऱ्या भाविकांसाठी मोफत बससेवेचे आणि कार चे आयोजन करण्यात आले. श्री. सुनिल संपत किंद्रे यांच्या सहकार्याने ही व्यवस्था करण्यात आली.या उपक्रमामुळे पश्चिम महाराष्ट्र भाविकांना मोठा दिलासा मिळाला असून, नागरिकांनी श्री.सुनिल संपत किंद्रे यांचे मनःपूर्वक आभार मानले.

## पनवेलमध्ये प्रजापिता ब्रह्माकुमारीज ईश्वरीय विश्वविद्यालय व रोटरी ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन

**उरण । प्रतिनिधी**

राजयोगिनी प्रकाशमणी दादीजींच्या १८ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त तसेच विश्वबंधुत्व दिनाच्या पावन प्रसंगी प्रजापिता ब्रह्माकुमारीज ईश्वरीय विश्वविद्यालय, समाजसेवा विभाग - पनवेल व रोटरी ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २४ ऑगस्ट २०२५ रोजी हुतात्मा स्मारक उद्यान, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पनवेल येथे भव्य रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवर आमदार प्रशांत ठाकूर पनवेल, सुनील झुनझारराव, अध्यक्ष-भाजपा पनवेल शहर नगरसेवक, प्रीतम म्हात्रे अध्यक्ष - जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था,ऍड. श्रीमती शुभांगी झेमसे, डॉ. गुने (गुने हॉस्पिटल), डॉ. कुनाल माखिजा (पटेल हॉस्पिटल), डॉ. शुभदा नील (नील हॉस्पिटल), डॉ. अभिषेक सिंह (रोटरी ब्लड बँक) या मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून कार्यक्रमांची सुरुवात करण्यात आली.तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी आपल्या विचारातून एक मोलाचा संदेश दिला. व ब्रम्हाकुमारीज संस्थेचे व आयोजकाचे खूप कौतुक केले व रक्तदान केलेल्या व्यक्तीचे अभिनंदन करून त्यांना प्रोत्साहन दिले व रक्तदान याविषयी जनजागृती केली. तसेच या शिबिरामध्ये एकूण ४५ रक्त युनिट्स संकलित करण्यात आले. समाजहितासाठी ब्रह्माकुमारीज संस्थेच्या या उपक्रमाचे मान्यवरांनी मनःपूर्वक अभिनंदन केले. तसेच कार्यक्रमामध्ये रक्तदात्यांना ईश्वरीय सौगात, प्रमाणपत्र व प्रसाद देण्यात आला. तसेच मोफत शुगर तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. फळांचे प्रायोजक प्रीतम म्हात्रे यांनी केले.फळांचे वितरण राजयोगिनी तारा दीदी यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे माईन्ड स्पा यामधून लोकांनी मनाची एकाग्रता व शांती या गोष्टीची अनुभूती घेतली.तसेच रक्तदान करा - जीवन वाचवा, योगध्यान करा - जीवन घडवा हा संदेश या शिबिरातून यशस्वीरीत्या पोहोचवण्यात आला.



## कुंभारखणी खुर्द गावणवाडी येथील घरात घुसलेल्या बिबट्याला वनविभागाच्या पथकाने पिंजऱ्यात केले जेरबंद

**संगमेश्वर । प्रतिनिधी**

दिनांक २५ ऑगस्ट २०२५ रोजी पहाटे ४:३० वाजताच्या सुमारास मौजे कुंभार खनी खुर्द गावनवाडी तालुका संगमेश्वर जिल्हा रत्नागिरी येथील श्री ऋषिकेश रामचंद्र भालेकर यांचे राहत्या घराच्या मागील बाजूस असलेल्या बाथरूम मध्ये कुत्र्याचा पाठलाग करत असताना बिबट हा वन्यप्राणी अडकला असली ची बातमी पोलीस पाटील कुंभारकणी खुर्द यांनी वन विभागास दिली. मिळालेली माहिती वरिष्ठांना देऊन सर्व स्टाफसह साहित्यासह जागेवर जाऊन खात्री करता बाथरूम मध्ये कुत्रा व बिबट अडकला असल्याचे आढळून आले. सदर वेळी वन विभागाने बाथरूमचा दरवाजा वरील बाजूस लाकडी फळयानी बंद करून पिंजरा लावला व बिबट्यास सुरक्षित रित्या पिंजऱ्यामध्ये घेतले त्यानंतर कुत्रा पण सुरक्षित बाथरुम मधुन बाहेर आला , सदर वन्य प्राणी बिबट याची मा पशुधन विकास अधिकारी श्रेणी १ कडवई श्री सूर्यकांत बेलुरे यांचे कडून वैद्यकीय तपासणी करून घेतली . बिबट नर असून वय आठ ते नऊ वर्ष आहे, सदर वन्य प्राणी बिबट तंदुरुस्त असलेचे पशुवैद्यकीय अधिकारी यांनी सांगीतले त्यानंतर त्याला नैसर्गिक अधिवासात मुक्त केले. सदर वेळी घटनास्थळी परिक्षेत्र वन अधिकारी रत्नागिरी श्री प्रकाश सुतार, परिमंडळ वन अधिकारी ,संगमेश्वर देवरुख ,श्री. न्हानू गावडे, वनरक्षक फुणगूस श्री आकाश कडूकर वनरक्षक साखरपा श्री. सहयोग कराडे , वनरक्षक दाभोळे श्रीमती सुप्रिया काळे, वनरक्षक आरवली श्री सुरज तेली वनरक्षक जाकादेवी श्रीमती शर्वरी कदम पोलीस पाटील कुंभारखणी खुर्द श्री रविंद्र महाडिक व ग्रामस्थ हे उपस्थित होते. सदरची कार्यवाही माननीय विभागीय वन अधिकारी रत्नागिरी चिपळूण श्रीमती गिरीजा देसाई तसेच सहाय्यक वनसंरक्षक रत्नागिरी चिपळूण श्रीमती प्रियंका लगड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. अशा प्रकारच्या घटना घडल्यास किंवा वन्यप्राणी अडचणीत सापडल्यास वनविभागाचा टोल फ्री क्रमांक १९२६ किंवा ९४२१ ७४१३३५ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन वन विभागाचे वतीने विभागीय वन अधिकारी श्रीमती गिरीजा देसाई यांनी केले आहे.



## कोकणस्थ भाविकांसाठी श्री. गणेशोत्सवा निमित्त सोनखार ते सावंतवाडी मोफत बस सेवा




**मुंबई । प्रतिनिधी**

माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत साहेब यांच्या संकल्पनेतुन युवा नेते निशांत भगत आणि समाजसेवक संदीप भगत यांच्या मार्गदर्शनाखाली वाशीगाव, वाशी सेक्टर -३०, सानपाडा - सोनखार (पामबीच) व जुईनगर विभागातील कोकणस्थ रहिवासियांना श्रीगणेशोत्सवा निमित्ताने कोकणात आपआपल्या गावी सहज व सुखरूप जाता यावे यासाठी सानपाडा -सोनखार ते सावंतवाडी पर्यंत मोफत बस सेवेचा उपक्रम राबविण्यात आला. आपला प्रभाग आपला परिवार या ध्येय धोरणातून बससेवेचा सहकुटुंब लाभ घेतल्याबद्दल नागरिकांचे आभारी आहोत अशी भावना निशांत भगत यांनी व्यक्त केली.सदरहू बस शनिवारी नगरसेविका कार्यालय, पामबीच -सोनखार येथून प्रभागातील जेष्ठ नागरिक व नाखवा सिताराम भगत सांस्कृतिक उत्सव मंडळाचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत नारळ वाढवून गणपती बाप्पा च्या जयघोषात रवाना करण्यात आली.

# आरोग्य कर्मचाऱ्यांचे योगदान अमूल्य; शासनाने तातडीने नियमितीकरण करावे-खा.प्रतिभा धानोरकर

## राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाला खा.प्रतिभा धानोरकर यांचा पाठिंबा







**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी व कर्मचारी एकत्रीकरण समिती तसेच एकता संघटनेच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे आपल्या न्याय्य मागण्यांसाठी 'बेमुदत कामबंद' आंदोलन सुरू केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या दि. १४/०३/२०२४ रोजीच्या निर्णयानुसार नियमित शासन सेवेत समायोजन व बदली धोरण, वेतनवाढ, ईपीएफ, आरोग्य व अपघात विमा आदी लागू करण्याच्या मागणीसाठी हे आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला खासदारप्रतिभा धानोरकरयांनी भेट देऊन पत्राद्वारे आपला पूर्ण पाठिंबा जाहीर केला.

प्रतिभा धानोरकरयांनी यावेळी बोलताना सांगितले की, सार्वजनिक आरोग्य विभागातील कंत्राटी कर्मचारी अनेक वर्षांपासून अखंड सेवा बजावत आहेत. शासनाने या कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घ्यावे, यासाठी मी आमदार असताना सातत्याने प्रयत्न केले आहेत. कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्या विधानसभेत मांडल्या होत्या. विशेषतः १० वर्षांहून अधिक काळ सेवा बजावलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नियमितीकरणासाठी मी सभागृहात ठाम आवाज उठवला होता. या पाठपुराव्यामुळेच सरकारने नियमितीकरणाचा आदेश जारी केला.

त्या पुढे म्हणाल्या, परंतु अत्यंत खेदाने सांगावे लागते की, आदेश असूनही परिचारिकांसह अनेक कर्मचाऱ्यांचे आजतागायत नियमितीकरण झालेले नाही. हे फक्त निराशाजनकच नाही, तर त्यांच्या निष्ठावंत परिश्रमांचा व योगदानाचा अवमान आहे.

या लढ्यात कर्मचाऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आश्वासन देतप्रतिभा धानोरकरम्हणाल्या, कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण हा त्यांचा हक्क आहे. या हक्कासाठी लढणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाला माझा पूर्ण पाठिंबा आहे. तुमच्या या लढ्यात मी खंबीरपणे तुमच्या सोबत उभी आहे. तुमच्या मागण्या मान्य व्हाव्यात यासाठी मी पुन्हा एकदा संसदेत आणि केंद्र सरकारकडे ठोस पाठपुरावा करेन. यावेळी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी आंदोलन कर्त्यांना पाठिंब्याचे पत्र दिले.आंदोलक कर्मचाऱ्यांनी शासनाने या विषयाकडे तातडीने लक्ष देऊन त्यांच्या मागण्या मान्य कराव्यात अशी मागणी त्यांनी केली आहे.

# शांततेत गणेशोत्सव साजरा करण्याचे उपविभागीय अधिकाऱ्यांचे आवाहन; शांतता समितीची बैठक संपन्न

**नंदुरबार | दिपक गोसावी**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता राखण्याच्या उद्देशाने बोरद येथे नुकतीच शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत उपविभागीय अधिकारी सुभाष भोळे यांनी सर्व गणेश मंडळांना शांततेत आणि सलोख्याने उत्सव साजरा करण्याचे आवाहन केले. कोणताही समुदाय दुखावला जाणार नाही याची काळजी घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले. यावेळी मार्गदर्शन करताना सुभाष भोळे म्हणाले की, गणेश मूर्तींची स्थापना होणाऱ्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे आवश्यक आहे. देखावे सात्विक असावेत आणि कोणत्याही समाजाच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी. सोशल मीडियाचा उपयोग विधायक कामांसाठी करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

भोळे यांनी गणेश मंडळांना सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार डीजे न वापरण्याचा सल्ला दिला. नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई केली जाईल आणि संबंधितांवर गुन्हा दाखल होऊन त्यांना ४० वर्षे कोर्टात चकरा माराव्या लागतील, असा इशाराही त्यांनी दिला. याच बैठकीत प्रभारी पोलीस निरीक्षक राजू लोखंडे यांनी मिरवणुकीच्या मार्गावर लटकत असलेल्या विजेच्या तारांबाबत विद्युत वितरण विभागाकडे तक्रार करून त्या दुरुस्त करून घेण्याचे आवाहन केले. शासनाच्या बक्षिसाला पात्र ठरतील असे देखावे सादर करण्याचे त्यांनी सुचवले. तसेच, मद्यपान करून मिरवणुकीत सहभागी न होण्याचे आणि रात्रीच्या वेळी मंडळांच्या संरक्षणासाठी दोन स्वयंसेवक ठेवण्याचे आवाहनही त्यांनी केले. या बैठकीला रविंद्र भिलाव, उपसरपंच संतोष ढोडरे, माजी सरपंच सुकलाल ठाकरे,कुणाल पाडावी यांच्यासह श्री जय बजरंग गणेश मित्र मंडळ, श्री गौरी पुत्र गणेश मंडळ, रायबा गणेश मंडळ, श्री भगवे वादळ गणेश मंडळ, श्री शिव गणेश मंडळ, श्री दत्त गणेश मंडळ, श्री एकलव्य गणेश मंडळ, श्री सार्वजनिक गणेश मंडळ, श्री चॅलेंज ग्रुप मित्र मंडळ यांसारख्या विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीचे नियोजन सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रकाश अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार भीमसिंह ठाकरे पोलीस नाईक राजू जगताप पोलीस कॉन्स्टेबल तुकाराम पावरा यांनी केले.



# आजचा काळ अपडेट नव्हे तर अपग्रेड होण्याचा आहे-गणेश जाधव

## तुलसी महाविद्यालयात कृत्रिम बुद्धिमत्ता व आयओटी विषयावर सेमिनार यशस्वीरीत्या संपन्न

**बीड | प्रतिनिधी**

आजचा काळ हा केवळ अपडेट राहण्याचा नसून अपग्रेड होण्याचा आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज यांच्या साहाय्याने समाज व उद्योग क्षेत्रात क्रांतिकारक बदल घडत आहेत. या बदलांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांनी पुस्तकी शिक्षणापुरते मर्यादित न राहता प्रकल्पाधिष्ठित कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पीएचएन टेक्नॉलॉजीचे तंत्रज्ञान एज्युकेटर व ऑपरेशनल एक्झिक्युटिव्ह गणेश जाधव यांनी केले. ते तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे सोमवार, दि.२५ ऑगस्ट रोजी झालेल्या 'कृत्रिम बुद्धिमत्ता व आयओटी' या विषयावरील सेमिनारमध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. जाधव यांनी भारतीय अर्थव्यवस्थेतील बदलांवरही भाष्य करताना सांगितले की, भारतीय तंत्रज्ञान क्षेत्र हे दीर्घकाळ सर्व्हिस बेसवर उभे होते. मात्र रोबोटिक्स आणि




आर्टिफिशियल इंटेलिजन्समुळे जागतिक अर्थव्यवस्थेत मोठा बदल झाला असून याचा परिणाम भारतीय सर्व्हिस सेक्टरवर झाला आहे. प्रकल्पांची संख्या कमी झाली आहे. त्यामुळे भविष्यात प्रोजेक्ट बेस्ड टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट ही मोठी गरज ठरणार आहे, असे ते म्हणाले. सेमिनारमध्ये प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून आयओटी उपकरणे व मशीन लर्निंगची कार्यपद्धती विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली. सेन्सर्स, हार्डवेअर-सॉफ्टवेअर आणि इंटरनेट यांचा संगम कसा होतो याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी उत्सुकतेने अनुभवले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य प्रा.डी.जी. निकाळजे यांनी म्हटले की, मशीन लर्निंग व आयओटी तंत्रज्ञानामुळे जगात मोठे बदल होत असून विद्यार्थ्यांनी या नव्या तंत्रज्ञानाचे ज्ञान आत्मसात करून भविष्यातील करिअर संधी साधल्या पाहिजेत. याच हेतूने या सेमिनारचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या वेळी प्राध्यापकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.गजानन खेत्री यांनी केले, तर आभारप्रदर्शन प्रा.विवेक जोगदंड यांनी मानले.

# अबब चक्क शाळेची इमारत उभी असलेल्या जमिनी उचलला पिक विमा

## शिक्षण संस्थेवर कारवाई करण्याची मागणी

**केज | गौतम बचुटे**

पिक विमा आणि त्याच्या सुरस कथा ऐकायला मिळत असताना केज तालुक्यात एका शिक्षण संस्था चालकाने तर कहरच केला आहे. चक् शाळेची इमारत उभी असलेल्या जमीचा प्रधान मंत्री किसान योजने अंतर्गत पिक विमा उचलून फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी चौकशी करून कारवाई करावी या मागणीचे निवेदन मुख्यमंत्र्यांसह इतर संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहे.




केज तालुक्यातील लव्हुरी येथे श्री बडेबाबा विद्यामंदिर लव्हुरी या शिक्षण संस्थेला शासकीय वेतनेत्तर अनुदान मिळत असताना देखील शाळेची इमारत ज्या सर्व्हे नंबर १२२/२ मधील ०.८० क्षेत्रावर शाळेची इमारत आणि खेळाचे मैदान असताना त्या जमीनचा वापर हा अकृषिक वापरासाठी होत असताना या शिक्षण संस्था चालकाने सरकारची फसवणूक केली आहे. संस्था चालकाने चक्क सन २०२३ या वर्षात याच शाळेची इमारत उभी असलेल्या जमिनीत पिक पेरा केल्याचे खोटे पुरावे जोडून प्रधान मंत्री किसान योजने अंतर्गत पीक भरून त्याचा लाभ घेतला आहे. या बोगस पीक विमा प्रकरणाची माहिती मिळाल्या नंतर सामाजिक कार्यकर्ते संदीप चाळक यांनी प्रधानमंत्री किसान विमा योजनेचा लाभ घेऊन शासनाची फसवणूक केली असल्याने संस्थेच्या कार्य मंडळावर कायदेशीर कारवाही करून संस्थेची मान्यता रद्द करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते संदीप उत्तरेश्वर चाळक यांनी निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनाच्या प्रति मुख्यमंत्र्यांसह शिक्षणमंत्री, शिक्षण संचालक, विभागीय आयुक्त, शिक्षण उपसंचालक, जिल्हाधिकारी, तहसीलदार साहेब आणि गट शिक्षणाधिकारी यांनी दिल्या आहेत.असा भरला पीक विमा :- ज्या अकृषिक जमिनीवर शाळेची इमारत आणि खेळाचे मैदान आहे त्या जमिनीचा पीक विमा भरताना त्याचा प्लिकेशन आयडी: ०४०१२७०३००१०५११५६८४०२ हा असून आणि त्याचा मोबाईल न. ९५११८१५५५७ या न. वर पिक विमा भरला आहे. तसेच या योजनेचा लाभ स्टेट बँक ऑफ इंडियाच्या -६२२१२५१२११२ या खात्यावर २५ % अग्रिम म्हणून ५ हजार २११ रु एवढा लाभ घेतला आहे._पद भरतीत सुद्धा गैरव्यवहार झाल्याचा आरोप :- श्री बडेबाबा शिक्षण संस्थेतील रिक्त झालेली पदे न भरल्याने विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत आहे. अनेक सुशिक्षित पात्र असताना डावलले जात असल्याने संस्थेची मान्यता रद्द करावे. अशीदेखील मागणी असून त्यासाठी आंदोल छेडण्याचा इशारा देखील दिला आहे.

# वाहतूक पोलिसांना दोनशे केसेसचे टार्गेट, फडणवीस सरकार गोरगरिबांना लुटतंय:नाना पटोलेंनी साधला सरकारवर निशाणा

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्य सरकारकडून वाहतूक पोलिसांना दंड वसुलीचे टार्गेट देण्यात आल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. त्यांनी स्पष्ट शब्दांत म्हटलं की, गोर गरिबांच्या खिशाला कात्री लावून सरकार तिजोरी भरत आहे, तर अदानी-अंबानीसारख्या उद्योगपतींना खुलेआम फायदा देत आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे त्यांनी विधानसभेत सरकारने खोटं बोलल्याचा ठपका ठेवत, गरिबांच्या शोषणाच्या या प्रकाराविरोधात सरकारवर अविश्वास प्रस्ताव आणण्याचा इशारा दिला आहे.

नाना पटोले म्हणाले की, महाराष्ट्रातील फडणवीस सरकार कसे गोरगरीब जनतेला लुटते आहे. हे अजून स्पष्ट होत आहे. सरकार अदानी अंबानींना पैसे देत असून गोरगरीब लोकांना लुटत आहे. पोलिसांनी टार्गेट दिले आहे की दोनशे केसेस एका वाहतूक पोलिसांनी केल्या पाहिजेत. ते पैसे गोळा करत सरकारच्या तिजोरीत जमा केले पाहिजे. राज्याचे सरकार विधानसभेत सांगते की आम्ही कुठलेही टार्गेट दिलेले नाही. माझ्याजवळ एक पोलिसांच्या चर्चेचा पुरावा आहे त्यांना टार्गेट दिलेला असून वरीष्ठाकडून आम्हाला टार्गेट पूर्ण करण्याचा सूचना असल्याचे ते सांगत आहेत.नाना पटोले म्हणाले की, सरकारला माझा एक सवाल आहे तुम्हाला गोरगरिबांना लुटायचे आहे का? एकीकडे लाडकी बहीण म्हणून पैसे देत आहात आणि दुसरीकडे तिच्या पतीला



लुटू लागले आहात.म्हणून सरकारने गरीब आणि मध्यमवर्गीय लोकांना लुटायचे थांबवले पाहिजे. नाहीतर विधानसभेत सरकारने खोटी माहिती दिल्याबद्दल सरकारवर अविश्वास आणावा लागेल, असा इशारा नाना पटोले यांनी दिला आहे. सरकारकडून अशा पद्धतीने जनतेला लुटणे आम्हाला मान्य नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर लक्ष द्यायला हवे, ही आमची विनंती आहे.नाना पटोले म्हणाले की, आमचे नेते राहुल गांधी हे रस्त्यावरची लढाई लढत आहेत. ते बिहारमध्ये रस्त्यावर उतरले आहेत. त्यानंतर संसदेत आम्ही ही लढाई कायम ठेवणार असून त्यानंतर सुप्रीम कोर्टात जाणार आहोत. बावनकुळे यांचा अभ्यास थोडा कमी आहे. राज्य निवडणूक आयोगाकडे तरी सध्या मतदार याद्या आहेत का? त्यांच्या वेबसाईटवर याद्या पाहायला भेटतात का? केंद्रीय निवडणूक आयोग जो पर्यंत यादी काय पाहणार? ते कुठल्या याद्या दाखवणार आहेत.ह्या याद्या वेबसाई वरुन का लपवल्या जात आहे. याद्या देणं आता बंद करण्यात आले आहे. त्यांचा अभ्यास कमी असताना चंद्रशेखर बावनकुळे बोलायचे म्हणून काही तरी बोलतात.

# मुंबई भाजप अध्यक्षपदी अमित साटम

**मुंबई (वृत्तसंस्था)**भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सोमवारी मुंबई भाजपच्या अध्यक्षपदी आमदार अमित साटम यांची निवड केली. ते मंत्री आशिष शेलार यांची जागा घेतील. मुंबई महापालिका आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने साटम यांच्या खांद्यावर देशाच्या आर्थिक राजधानीची जबाबदारी टाकली आहे. त्यामुळे ही निवडणूक अत्यंत चुरशीची होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

भाजपच्या मुंबई व महाराष्ट्रातील प्रमुख नेत्यांची आज सकाळी मुंबईत बैठक झाली. या बैठकीत अंधेरी पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमित साटम यांची मुंबईच्या अध्यक्षपदी निवड केली. त्यानंतर आयोजित एका पत्रकार परिषदेत भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली. भाजप अध्यक्ष जे पी नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तथा महाराष्ट्राचे नेते देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्वच पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून मुंबई भाजपच्या




अध्यक्षपदी अमित साटम यांची करण्यात आली आहे, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी त्यांच्या नियुक्तीचे पत्र साटम यांना सुपूर्द केले.

# धोका देणाऱ्यांची डोकी फुटतील, शिवसेना फुटणार नाही:ठाकरेंचा शिंदे गटावर घणाघात

**मुंबई (वृत्तसंस्था)**–उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या शाखेत कार्यकर्त्यांशी संवाद साधताना आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार याद्यांची तपासणी करण्याचे निर्देश दिले. तसेच, शिंदे गटावर सडकून टीका करत त्यांना 'काळे मांजर' असे संबोधले. शिवाय धोके देणाऱ्यांची डोकी फुटतील, पण शिवसेना फुटणार नाही, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच जाहीर होऊ शकतात. या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांकडून जोरदार तयारी करण्यात येत आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख यांनी पक्षाच्या शाखा भेटी सुरू केल्या आहे. आज त्यांनी मुंबईतील शिवसेना शाखेला भेट दिली. यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी मतदारयादील घोळ आणि शिंदे गटावर टीका केली.

गेले दोन तीन वर्ष सतत प्रसारमाध्यमांतून येते की, इकडे शिवसेनेला धक्का, तिकडे धक्का. एकदा जाऊनच बघू किती धक्के बसलेत. असे धक्के देणारे अनेक जण आले आणि अनेकजण गेले. पण शिवसेनेला कुठेतरी कदाचित धक्का बसला असेल, पण धोका झालेला नाही. अनेकांनी धोके देण्याचे अनेक प्रयत्न केले. यानंतही ते होतील. पण जोपर्यंत तुमची तटबंदी मजबूत आहे. तोपर्यंत धक्का आणि धोके देणाऱ्यांची डोकी फुटतील, पण शिवसेना फुटणार नाही, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटावर केली.गणेशोत्सवाच्या तोंडावर उद्धव ठाकरे यांनी गणपतीच्या चरणी प्रार्थना केली. आम्ही हिंदुत्वाचा पवित्र भगवा घेऊन पुढे जात आहोत. वाटेत स्वतःला वाघ म्हणवणारे अनेक काळे



मांजरे आडवी येतात. गणराया, त्या अपशकुनी मांजरांचा बंदोबस्त तूच कर, नाहीतर त्यांचा बंदोबस्त करायला आम्ही शिवसैनिक आहोतच, असे म्हणत त्यांनी शिंदे गटावर थेट हल्लाबोल केला.आता गणपती उत्सव आहे. त्यानंतर पितृपक्ष येईल. पितृपक्ष मी आपलाच मानतो. कारण माझा पक्ष हा पितृपक्षच आहे. शिवसेनेची स्थापना माझ्या पित्यानेच केलेली आहे. ज्यांच्याकडे काही आगा-पिछा नाही, त्यांना सगळ्या चोऱ्या कराव्या लागतात, अशी टीका उद्धव ठाकरेंनी एकनाथ शिंदे यांचे नाव न घेता केली. पितृपक्षानंतर नवरात्र सुरू होईल. म्हणता म्हणता निवडणुका येतील. म्हणून आजपासूनच मतदारयाद्यांची तपासणी सुरू करा, अशा सूचना उद्धव ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना केल्या.उद्धव ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना निवडणुकीच्या तयारीला लागण्याचे आवाहन करत, मतदारयाद्या तपासण्याचे महत्त्वाचे काम दिले. आपल्या वॉर्डात मतदारयादीत मतचोरी होते का? मतचोर घुसलेत का? प्रत्येक गटप्रमुख आणि प्रत्येक कार्यकर्त्याने बघायचे आहे. घरोघरी जाऊन एका माणसाला एकच मत आहे की नाही, ते बघा. नाहीतर, निवडणुकीच्या दिवशी आपल्यात जे मतदार नाहीत, त्यांच्या नावाने बोगस मतदान होते. काही ठिकाणी दुबार, तिबार मतदान होते. आता डोळ्यात तेल घालून घरोघरी मतदारयादी तपासा, असा सूचना त्यांनी कार्यकर्त्यांना केल्या.मागील विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात ४०-४२ लाख बोगस मतदार घुसवले गेल्याचा आरोपही त्यांनी केला. हे घुसलेले कोण आहेत? ते बघा. त्यांना मतदान करू देऊ नका. आगामी निवडणुकीत आपल्या बाजुने मतांचा पाऊस कसा पडेल ते बघा, असेही उद्धव ठाकरे यांनी म्हटले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077